(1) 2021 पर्यंत

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई
# आणि
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
# यांच्यात ज्ञानमंडळ स्थापन करण्यासाठी करावयाचा करार

विषय - माहिती तंत्रज्ञान-संगणकविज्ञान

**करार करून देणार -**
**कुलसचिव,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद-४३१००४.**
**फोन नं. ०२४०-२४०३३३३.**
**ई-मेल-registrar@bamu.ac.in**

**करार करून घेणार -**
**सचिव,**
**महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,**
**रविंद्र नाट्यमंदिर इमारत, २ रा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५.**
**दूरध्वनी//फॅक्सक्र. ०२२-२४२२९०२०, ०२२-२४२२९०२७.**
**ई-मेल - vinimaprashasan@yahoo.co.in**

सचिव

Marathi Encyclopaedia Update

**प्रकल्पाचे नाव - मराठी विश्वकोश अद्ययावतीकरण**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना दि. १९ नोव्हेंबर १९६० रोजी झाली. त्यानंतर मंडळाचे विभाजन होऊन स्वतंत्र ' महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ ' हे महाराष्ट्र शासनाने दि. १ डिसेंबर १९८० रोजी स्थापन केलेले मंडळ असून विश्वकोशाच्या द्वारा जगातील विविध विषयातील ज्ञान मराठीत आणण्यासाठी या मंडळाची स्थापना झाली. आपला उद्देश अधिक परिणामकारकरित्या साध्य करण्यासाठी विविध विद्यापीठे, शैक्षणिक व संशोधन संस्था यांना ज्ञानमंडळाच्याद्वारे सहभागी करून घेण्याकरिता सामंजस्य करार करण्याचा निर्णय घेतला आहे.

विश्वकोश मंडळाने आपल्या कार्यासाठी विविध विद्यापीठांचे सहकार्य घ्यावे असे निर्देश महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १७ जून १९६४ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील विद्यापीठाची उद्दिष्टे मुद्दा क्र. ४ मध्ये पुढील उद्दिष्टे नमूद केले आहेत.

१) ज्ञानाची निर्मिती, जतन व प्रसार करण्याची आपली जबाबदारी पार पाडणे.

६) विद्यापीठाने स्थानिक, प्रादेशिक व राष्ट्रीय विकासाच्या समस्यांमध्ये जवळून सहभागी होणे, ज्ञान व कौशल्य यांचा लाभ व्यक्ती व समाज यांच्या विकासासाठी उपलब्ध करून देणे.

८) सर्वांना उच्च शिक्षणाचे अध्यापन, अध्ययन, प्रशिक्षण व इतर आधारभूत सेवासुविधा यांची समान संधी उपलब्ध करून देणे.

१०) व्यक्तिगत आकलनविषयक क्षमता दडपून न ठेवता काहीशा नावीन्यपूर्ण कल्पना व इच्छा प्रत्यक्षात साकार करण्यासाठी आणि स्व-कर्तृत्व सिध्द करण्यासाठी त्या विकसित केल्या असल्याची सुनिश्चिती करणारी प्रेरणादायी प्रणाली योजना तयार करणे.

११) वेगाने विकास व परिवर्तन होत असलेल्या समाजात ज्ञान संपादनास चालना देणे, बुध्दिजीवी समाजाला योग्य अशी आधुनिक प्रसारमाध्यमे, माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान आणि इतर उद्गामी व भविष्यातील तंत्रज्ञान यांचा वापर करून उच्च शिक्षणाचे जाळे निर्माण करून मानवी कर्तृत्वाच्या सर्व क्षेत्रांमधील नवनवीन कल्पना, संशोधन व शोध यांच्या संदर्भात ज्ञान, प्रशिक्षण व कौशल्य यांचा दर्जा वाढविण्याच्या संधी सातत्याने उपलब्ध करून देणे.

१२) वेगवेगळे धर्म, साहित्य, इतिहास, विज्ञान आणि कला, सभ्यता व संस्कृती यांच्या अभ्यासामार्फत राष्ट्रीय एकात्मता, बंधुता वाढीस लावणे आणि सांस्कृतिक वारसा जतन करणे तसेच भारतातील विभिन्न धर्म आणि विविध संस्कृती यांच्या प्रती आदर वृध्दिंगत करणे.

१८) सर्व विद्याविषयक व विद्यार्थ्यांशी संबंधित असलेल्या इतर बाबींच्या संबंधात एकमेव मार्गदर्शक निकष म्हणून स्पर्धात्मक गुणवत्ता व श्रेष्ठत्व वाढीस लावण्याचे प्रयत्न करणे.

त्याचबरोबर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील विद्यापीठाचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे नमूद केले आहेत.

२) संशोधन आणि ज्ञानवर्धन व ज्ञानप्रसार यांसाठी तरतूद करणे आणि सर्वसाधारणत: (ललित कला व प्रायोगिक कला यांसह) कला व शास्त्रे, मानवविज्ञान, सामाजिक शास्त्रे, लेखा व वाणिज्य, शुध्द व उपयोजित शास्त्रे, तंत्रज्ञाने, व्यवस्थापन, औषधवैद्यकशास्त्राचे निरनिराळे प्रकार, अभियांत्रिकी, कायदा, शारीरिक शिक्षण आणि अध्ययनाच्या इतर शाखा व संस्कृती व त्यांच्या बहुविद्याशाखांची व आंतरविद्याशाखांची क्षेत्रे यांचे संवर्धन करणे व त्यांना चालना देणे.

७) विभाग, संशोधन परिसंस्था, विशेषीकृत अभ्यासक्रम परिसंस्था किंवा विद्याविषयक सेवा युनिट यांची स्थापना करणे, त्या चालवणे व त्यांचे व्यवस्थापन करणे.

सचिव

६४) विद्यापीठाने स्वत: किंवा इतर विद्यापीठाच्या सहकार्याने, राज्य शासनाच्या धोरणाचे अनुपालन करून मराठीचा अभ्यासक्रम आणि शिक्षण, अभ्यास, संशोधन व परीक्षा यांचे माध्यम म्हणून मराठीचा वापर करण्यास चालना देणे.

६८) जे समकालीन, जागतिकदृष्ट्या स्पर्धात्मक आणि स्थानिक तसेच धार्मिक व राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे अशा ज्ञानाची निर्मिती करणे व त्याचा प्रसार करणे आणि श्रेष्ठ दर्जाच्या संशोधनाची जोपासना करणे.

६९) विद्यार्थीकेंद्री दृष्टिकोन ठेवणे आणि ज्ञानाची निर्मिती करण्यासाठी भूमिका पार पाडणे.

८१) विद्यापीठाचे वरील अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांच्या संदर्भात, राज्य शासनाव्दारे वेळोवेळी देण्यात आलेल्या निदेशांचे अनुपालन करणे व ते पार पाडणे.

तसेच, मराठी विश्वकोशाच्या अद्ययावतीकरणासाठी ज्ञानमंडळे स्थापन करण्यास मान्यता देणेबाबत महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. विकोश २०१५/ प्र.क्र. १७१ / भाषा-२, दि. २३ फेब्रुवारी २०१६, शासन निर्णय क्र. विनिमं २०१८/प्र.क्र.११०/भाषा-२, दि. २२ फेब्रुवारी २०१९ व शासन निर्णय क्र. विनिमं २०२०/प्र.क्र.६१/भाषा-२, दि. १८ ऑगस्ट २०२० नुसार सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्यात सामंजस्य करार करण्यात येत आहे.

**योजनेचा उद्देश** - मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने विश्वकोशाचे २० खंड, परिभाषाकोश व सूची खंडांची निर्मिती केली आहे. त्याचबरोबर कुमार विश्वकोश भाग २ (जीवसृष्टी आणि पर्यावरण) या विषयांतील ३ खंडांची निर्मिती केली आहे. मराठी विश्वकोशाच्या २० खंडांतील नोंदींचे अद्ययावतीकरण करणे, विविध विषयावरील नव्या माहितीची सातत्याने भर टाकणे यासाठी ज्ञानमंडळाची स्थापना परिशिष्ट -१ नुसार करण्यात येत आहे. प्रत्येक उपविषयासाठी स्वतंत्र ज्ञानमंडळ स्थापन करून ही सर्व ज्ञानमंडळे संकेतस्थळाव्दारे जोडणे व त्या आधारावर विश्वकोशाची पुढील रचना करणे हा उद्देश आहे.

**योजनेचे स्वरूप -**

१) मराठी विश्वकोश खंड १ ते २० मधील नोंदींच्या अद्ययावतीकरणाच्या प्रक्रियेमध्ये कालबाह्य झालेल्या नोंदी निश्चित करणे, विद्यमान नोंदींचे पुनर्लेखन करणे, नव्या नोंदी लिहून घेणे आदि विविध विषयांचा समावेश असेल. हे प्राथमिक काम झाल्यानंतर जगामध्ये प्रकाशित होणाऱ्या माहितीच्या साहाय्याने नोंदी अद्ययावत करण्याची प्रक्रिया सातत्याने चालू ठेवणे याही कामाचा अंतर्भाव असेल. यासाठी ज्ञानमंडळाची स्थापना करण्यात येत आहे. प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र ज्ञानमंडळ असेल आणि ही सर्व ज्ञानमंडळे संकेतस्थळाव्दारे जोडली जातील.

२) या योजनेच्या अंतर्गत कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठाने 'माहिती तंत्रज्ञान-संगणकविज्ञान' या विषयाची पालकसंस्था म्हणून ज्ञानमंडळाची जबाबदारी घेण्यासाठी हा सामंजस्य करार करण्यात येत आहे.

**ज्ञानमंडळाची कार्यपध्दती, कामकाज पार पाडण्यासंबंधी अटी व शर्ती -**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद 'माहिती तंत्रज्ञान-संगणकविज्ञान' या विषयाच्या ज्ञानमंडळाची जबाबदारी स्वीकारत आहे.

२) या ज्ञानमंडळात एक समन्वयक आणि तीन ते पाच तज्ज्ञांचे सल्लागार मंडळ असेल. तज्ज्ञांची निवड शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि ज्ञानमंडळामार्फत करावयाच्या कार्याला वेळ देऊ शकतील अशा तज्ज्ञांची निवड करण्यात येईल. ही निवड मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष, विषयपालक आणि संस्था प्रतिनिधी यांच्या परस्पर विचार विनिमयाने करण्यात येईल. मराठी विश्वकोश निर्मिती मंडळातील विषयपालक हे ज्ञानमंडळाचे पदसिद्ध सदस्य असतील. ज्ञानमंडळातील सल्लागार मंडळातील नेमावयाच्या तज्ज्ञांची नावे समन्वयकाने विश्वकोश कार्यालयास पाठवून मान्यता घ्यावी व त्यानंतरच संबंधितांना समन्वयकांच्या स्तरावरून कळविण्यात यावे.

३) संबंधित विद्यापीठ / शैक्षणिक व संशोधन संस्थेतील मराठीतून संशोधनात्मक लेखन करण्याचा अनुभव असलेले विषयतज्ज्ञ / सेवानिवृत्त तज्ज्ञ / संशोधक विद्यार्थी (M.Phil / Ph.D. / Other) यामधून समन्वयक नेमण्यात येईल. समन्वयक परिशिष्ट १ मध्ये 'समन्वयक' या शीर्षाखाली नमूद केल्याप्रमाणे जबाबदाऱ्या पार पाडतील.

४) ज्ञानमंडळाला आवश्यक कार्यालयीन सुविधा उदा. कार्यालय, इंटरनेट सुविधेसह संगणक, प्रिंटर इत्यादि व सल्लागार मंडळाच्या बैठकीसाठी आवश्यक सुविधा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद उपलब्ध करुन देईल.

५) 'माहिती तंत्रज्ञान-संगणकविज्ञान'या विषयातील लेखकांची कार्यशाळा / प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी तसेच ज्ञानमंडळाचे काम परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे चालविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आवश्यक ती सर्व मदत करेल. ज्ञानमंडळाच्या माध्यमातून ज्या नोंदी तयार होतील त्यावर महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचा स्वामित्त्व हक्क राहील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या सहकार्याची योग्य ती नोंद घेण्यात येईल.

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे स्थापन करण्यात आलेल्या ज्ञानमंडळाची कालमर्यादा कमाल एक वर्षांची असेल, कामाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार हा कालावधी कमी अधिक करता येईल.

७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे स्थापन करण्यात आलेल्या ज्ञानमंडळाच्या कामकाजासाठी खालील बाबींवर होणाऱ्या संभाव्य वार्षिक खर्चाची रक्कम महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत देण्यात येईल.

(१) समन्वयक मानधन, (मराठी भाषा विभाग, शासन निर्णय दि. १८.८.२०२० मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रतिनोंद रु. ५०० प्रमाणे)

(२) ज्ञानमंडळ तज्ज्ञांचा बैठक खर्च, प्रवास खर्च, प्रशिक्षण / कार्यशाळेचा खर्च, स्टेशनरी, व इतर अनुषंगीक खर्च रु. ७५,०००/-

( प्रशिक्षण तज्ज्ञांचे मानधन प्रति तास रु. ७५० व प्रवास खर्च - वित्त विभाग, शा. नि. क्र. प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दि. ३ मार्च २०१० नुसार

प्रशिक्षणार्थींचा व तज्ज्ञांचा अल्पोपहार खर्च - प्रति व्यक्ती, प्रति दिन रु. २५०/-, स्टेशनरी, इतर खर्च.)

* प्रशिक्षणार्थींचा प्रवास खर्च - प्रवास खर्च वित्त विभाग, शा. नि. क्र. प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दि. ३ मार्च २०१० प्रमाणे मराठी भाषा विभाग शा. नि. क्र. विकोश-२०१५/प्र.क्र.१७१/भाषा-२, दि. २३.०२.२०१६ सेवासुविधा अ.क्र. ३ व ४ मध्ये नमूद केल्यानुसार, किंवा वेळोवेळी शासनाच्या सुधारित नियमानुसार संबंधित विद्यापीठ किंवा ज्ञानमंडळाच्या खर्चातून अदा करण्यात येईल.

* वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अर्थस २०२०/प्र.क्र.६५/भाषा-२ दि. ४.५.२०२० व मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. विनिमं-२०२०/प्र.क्र.६१/भाषा-२ दि. १८.८.२०२० नुसार सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात ज्ञानमंडळ बैठक, कार्यशाळा, प्रशिक्षण या बाबींवर खर्च करण्यात येऊ नये. ज्ञानमंडळाच्या लेखक कार्यशाळा/प्रशिक्षण वर्ग तसेच सल्लागार बैठका आधुनिक संगणकीय तंत्रज्ञानाच्या दृकश्राव्य माध्यमांचा वापर करून (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग/वेबिनार) घेण्यात याव्या. यामुळे प्रवासावर होणाऱ्या वेळेमध्ये व खर्चामध्ये देखील बचत होईल. वरील बाबींवर खर्च करण्याकरीता या कार्यालयाकडून वेळोवेळी कळविण्यात येईल.

८) ज्ञानमंडळाच्या खर्चाकरीता पालकसंस्थेने शक्य तो स्वतंत्र बँक खात्याची निर्मिती करावी.

सचिव

९) ज्ञानमंडळाच्या संभाव्य वार्षिक खर्चासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगा... पालकसंस्थेस दिलेल्या रकमेच्या खर्चाचे तपशिल व पावत्या वार्षिक खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र पालकसं... मराठी विश्वकोश निर्मिती मंडळास पाठविण्यात येईल. पालकसंस्थेने विशिष्ट कर्मचाऱ्याकडे याची जब... सोपवावी व या कामासाठी संबंधित कर्मचाऱ्याला वार्षिक कमाल रक्कम रू. २०००/- ज्ञानमंडळाच्या अनु... खर्चातून देण्यात यावी.

१०) नोंदींचे लेखन, समीक्षण-संपादन, भाषांतर करणाऱ्या तज्ज्ञांना मराठी भाषा विभाग, शासन निर्णय, क्र. मविवन-२०१३/प्र.क्र.७०/भाषा-२, दि. १० फेब्रुवारी २०१५ व शासन निर्णय क्र. मविवन-२०१३/प्र.क्र.७०/भाषा-२, दि. १० मार्च २०१५ नुसार मानधन / मोबदला महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत देण्यात येईल.

११) नोंदींशी संबंधित चित्रे, रेखाटने, नकाशे, चलचित्रे, ध्वनिचित्रफित (Audio Visual) याबाबतचे मानधन / मोबदला महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत नियमानुसार देण्यात येईल.

१२) ज्ञानमंडळाच्या कामाचा विषयपालक, विश्वकोश संपादकीय कर्मचारी, संस्थेचे प्रतिनिधी हे वेळोवेळी आढावा घेतील. समन्वयकाचे काम असमाधानकारक असल्यास समन्वयक बदलण्यात येईल.

१३) ज्ञानमंडळामार्फत प्रतिवर्षी किमान १०० नोंदींचे लेखन, समीक्षण-संपादन कार्य पूर्ण करणे अपेक्षित आहे.

१४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे स्थापन करण्यात आलेल्या ज्ञानमंडळाचा उद्देश संबंधित विषयातील अद्ययावत व परिपूर्ण माहिती मराठी भाषेतून अभ्यासकांना, जिज्ञासूंना मिळावी असा असल्याने हे काम अधिक चांगल्या रीतीने करण्याकरिता आगामी काळात ज्ञानमंडळाच्या कार्यपध्दतीत जे बदल करावे लागतील ते परस्परांच्या विचार विनिमयातून करण्यात येतील.

१५) 'माहिती तंत्रज्ञान-संगणकविज्ञान'या विषयाशी संबंधित लोकांच्या मनात जागृती निर्माण व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने परस्पर विचार विनिमयातून उपक्रम राबविण्यात येतील.

१६) ज्ञानमंडळाच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या नोंदींचा उपयोग त्या त्या विषयातील विद्यापीठ / संस्था स्तरावरील अभ्यासक्रमासाठी व पूरक संदर्भ म्हणून विद्यार्थी, अभ्यासक व जिज्ञासूंना व्हावा अशी अपेक्षा आहे. यासाठी संयुक्तपणे उपक्रमही राबविण्यात येतील.

१७) सदर करार पूर्वलक्षी प्रभावाने दि. ०६ जून २०२० पासून दि. ०५ जून २०२१ पर्यंत १ वर्षासाठी लागू राहील.

स्थळ -

दिनांक

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University

| करार करून देणार | करार करून घेणार |
|---|---|
| ( डॉ. जयश्री सूर्यवंशी ) | (संजय कृष्णाजी पाटील) |
| कुलसचिव | सचिव (अतिरिक्त कार्यभार) |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई |

कुलसचिव डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

साक्षीदार - १) प्रा. ... र. देशमुख

२) प्रा. ... देशमुख

सचिव